**महाराष्ट्र शासन, पशुसंवर्धन विभाग**

**व्यक्तिगत लाभ योजना निवड करण्यात आलेल्या लाभार्थ्याकडून घ्यावयाच्या**

**बंधपत्राचा नमुना**

**(शासन निर्णय क्र.राज्ययो-201९/प्र.क्र.४२/पदुम-4,मुंबई दि.२७/0४/20२३)**

(2 दुधाळ जनावरांचे गट वाटप योजना)

मी श्री./श्रीमती/कु. --------------------- रा------------------ ता----------------- जिल्हा ------------प्रतिज्ञापुर्वक लिहून देतो/देते की, जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त,-------------------यांचेकडून महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या नाविन्यपुर्ण योजना 2 दुधाळ जनावरांचे गट वाटप योजना या योजनेअंतर्गत आज दिनांक --------- रोजी माझे प्रकरण मंजूर झाले असून, मी शासनाने विहीत केलेल्या पध्दतीस अनुसरुन मला लागू असलेल्या 50 टक्के अनुदानावर / 75 टक्के अनुदानावर (लागू नसेल ते खोडावे) 2 दुधाळ जनावरांचा गट वाटप खरेदी आणि शासनाने निश्चित केलेल्या आराखडयाप्रमाणे गोठयाचे व चारा शेडचे बांधकाम करेन. सदर योजने अंतर्गत प्राप्त होणाऱ्या गायी/म्हशी योग्य त-हेने पालनपोषण करुन माझ्या कुटुंबाचे आथिर्क उत्पन्न वाढविण्यासाठी त्यांचा उपयोग करेन.

1. योजनेअंतर्गत प्राप्त झालेल्या गटातील गायी/म्हशी, पशुसंवर्धन विभागातील अधिकाऱ्यांना पाठपुरावा/ योजना मूल्यांकनासाठी आवश्यक त्या वेळेस उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी माझ्यावर आहे.
2. योजनेअंतर्गत प्राप्त झालेले गायी/म्हशी आजारी पडल्यास अथवा पशुवैद्यकाची गरज पडल्यास नजिकच्या पशुवैद्यकिय दवाखान्यात घेऊन जाईन व त्यांच्या सल्यानुसार उपचार करुन घेईन.
3. योजनेअंतर्गत प्राप्त झालेले गायी/म्हशी 3 वर्षे योग्य रितीने सांभाळणे व त्यापासून व्यवसाय करणे माझेवर बंधनकारक आहे.या दरम्यान विमा काढलेल्या जनावरांचा विम्याचा बिल्ला कानातून पडल्यास त्याबाबत त्वरीत बँक/ विमा कंपनी/पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांना कळविणे माझेवर बंधनकारक आहे, याची मला जाणीव आहे.
4. योजनेअंतर्गत प्राप्त झालेले गाय/म्हैस मृत पावल्यास नजिकच्या पशुवैद्यकिय दवाखान्यास सूचित करुन मृत जनावराचे शवविच्छेदन करुन घेईन व मिळणाऱ्या विमा रकमेतून गाय/म्हैस खरेदी करणे माझेवर बंधनकारक राहील.
5. योजनेअंतर्गत प्राप्त झालेल्या गायी/म्हशींना साथीच्या रोगापासून संरक्षण मिळण्यासाठी वेळोवेळी लसीकरण करुन घेण्याची जबाबदारी माझ्यावर राहील.
6. योजनेअंतर्गत प्राप्त झालेले गायी/म्हशी, काही कारणाने (असाध्य आरोग्य तक्रार) नाईलाजास्तव विकणे गरजेचे असल्यास पशुसंवर्धन विभागाच्या अधिकारी यांचे परवानगी शिवाय विकणार नाही.
7. मी महानगरपालिका /नगरपालिका/नगरपरिषद/नगरपंचायत/कटकमंडळे या क्षेत्रातील रहिवासी नाही.
8. मला 1 मे 2001 नंतर तिसरे हयात अपत्य नाही.

9. माझ्या कुटुंबातील कोणीही व्यक्ती कोणीही शासकीय/निमशासकीय/ स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सेवेत किंवा निवृत्त वेतनधारक तसेच राज्य, केंद्र शासन/स्थानिक स्वराज्य संस्थेचे सदस्य / पदाधिकारी / लोकप्रतिनिधी नाही

10. मला या अथवा तत्सम दुधाळ जनावरांचा गट वाटप/शेळी/मेंढी गट वाटप/ कुक्कुट गट वाटप या योजनांचा मागील तीन वर्षात लाभ मिळालेला नाही.

11. या योजनेमध्ये मला देण्यात आलेल्या 2 दुधाळ जनावरांचा गट वनक्षेत्रात चराईसाठी सोडणार नाही आणि वन व पर्यावरणाचा -हास होणार नाही याची मी काळजी घेईन.

12. माझ्याकडील सर्व गायवर्ग व म्हैसवर्गीय दुधाळ जनावरांची नोंदणी पशुसंवर्धन विभागाकडील इनाफ कार्यक्रमांतर्गत करुन घेईन.

13. माझ्याकडे असलेल्या प्रजननक्षम गायी-म्हशींना कृत्रिम रेतन करुन घेईन व त्याच्या नोंदी अद्ययावत ठेवेन.

14. माझ्याकडील एक वर्षावरील सर्व वळू व रेडे यांचे खच्चीकरण करुन घेईन.

15. माझ्याकडील सर्व गायवर्ग, म्हैसवर्गीय जनावरे तसेच शेळया-मेंढया यांना शासकीय दवाखान्यामार्फत सर्व रोगप्रतिबंधक लसीकरण करुन घेईन व माझ्याकडील जनावरांची आरोग्य पत्रिका अद्ययावत ठेवेन.

16. विहीत मुदतीत योजना पुर्ण करण्याची जबाबदारी माझी आहे आणि मी ती वेळेत पुर्ण न केल्यास मला दिलेला लाभ रद्य होऊन प्रतिक्षाधिन यादीतील लाभार्थीस सदरचा लाभ दिला जाईल याची मला जाणीव आहे व असे घडल्यास माझी काहीही तक्रार असणार नाही.

17. या योजनेबाबत मी अर्जात दिलेली माहिती खरी असून योजनेसंबंधीच्या सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत. योजनेतील जनावरे परस्पर विक्री केल्यास किंवा प्राप्त झालेल्या अनुदानाचा मी गैर उपयोग केल्याचे आढळून आल्यास माझेवर इंडियन पिनल कोड कलम 415 ते 464 पैकी लागू होणा-या कलमानुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल, तसेच मला दिलेल्या अनुदानाची व्याजासह एकरकमी वसुली, महसुली पध्दतीने करण्यास माझी सहमती आहे.

साक्षीदाराची स्वाक्षरी, नांव

व पुर्ण पत्ता

1.....................................

2. ..................................

लाभार्थीची स्वाक्षरी

लाभार्थीचे नांव व पुर्ण पत्ता :

पशुधन विकास अधिकारी (विस्तार)

पंचायत समिती -------- जिल्हा ---------